| ५ | कंत्राटी ग्रामसेवक मानधन- रु.६०००/- | **(एक)** आधीपासुन जिल्हा परिषद सेवेत नसलेले जे उमेदवार ३३ वर्षापेक्षा अधिक वयाचे नसतील ; आणि<br>**(दोन)** उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण ; किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) ; **किंवा**<br>शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदविका (बी.एस.डबल्यु) आणि;<br>**(तीन)** सगणक हाताळणी / वापराबाबत माहीती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. तसेच, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडील रिट याचिका क्र.७०७८/ /२०११ व इतर नुसार तसेच विषयांकीत रिट याचिकेमधील मा.औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशास अधिन राहुन एस.एस.सी.कृषी पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा कृषी विषयाची पदवी किंवा त्यातील उच्च अर्हता धारण करणारे उमेदवारसुद्धा कंत्राटी ग्रामसेवक पदासाठी अर्ज करु शकतील. आणि | १०० | २०० | सर्व विषय एच.एस.सी. दर्जाची परीक्षा व कृषी पदविका दर्जाचे प्रश्न | ०२/१२/२०१५ | सकाळी १०.०० ते ११.३० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शासन निर्णय क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ नुसार राज्य शासनाच्या गट अ ब आणि क मधील कर्मचा-यांना माहीती तंत्रज्ञान संचालनालयाने विहित केलेल्या परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण अनिवार्य आहे. | | | | | |
| ६ | विस्तार अधिकारी (कृषि) ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | १) मान्यताप्राप्त कृषि विदयापीठाची बी.एस्सी (कृषि) पदवी, किंवा बी. एस्सी (कृषि जैव तंत्रज्ञान), बी. एस्सी (कृषि व्यवसाय व्यवस्थापन), बी. एस्सी. (गृहविज्ञान), बी. टेक (अन्नतंत्र), बी. एफ. एस्सी., बी.एस्सी (उदयानविदया), बी. एस्सी (कृषि) / बी. टेक (कृषि अभियांत्रीकी), बी. एस्सी (फुलोत्पांदन/ वनशास्त्र)पदवी<br>किंवा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठाची वरीलपैकी एक विषयांतील पदवी उत्तीर्ण<br>आणि नियुक्ती आदेश दिलेनंतर एक वर्षाचे आत संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेली परिक्षा उर्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. | १०० | २०० | मराठी १२ वी दर्जा व कृषि संबंधी प्रश्न पदवी दर्जाची परिक्षा | २५/११/२०१५ | दुपारी २.०० ते ३.३० |
| ७ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) ५२००-२०४०० ग्रेडवेतन -२४०० | १.मान्यताप्राप्त अशा उमेदरामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.विदयापीठाची पदवी धारण करीत असतील याबाबतीत लेखाशास्त्र आणि लेखापरीक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा पहिल्या व द्वितीय वर्गातील पदवी धारण करणा-या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकारणात तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधीपर्यत लेखा विषयक कामाचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.<br>२.नामनिदर्शेनाद्वारे नेमणुक दिलेल्या व्यक्तीला, त्या पदावर नेमणूक झाल्याची तारीख अथवा अशा प्रकारच्या विभागीय परीक्षाचे नियम विहित करणारी तारीख यातील जी तारीख नंतरची असेल त्या तारखेपासून दोन वर्षाच्या आत विभागीय परीक्षा उतीर्ण व्हावे लागेल.<br>३.परंतू अपवादत्मक बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी कारणे लेखी नमुद करुन उतीर्ण होण्याचे कालावधीत एक वर्षाने वाढ करु शकेल. | १०० | २०० | मराठी १२ वी दर्जा, लेखा विषयक प्रश्न इतर पदवी दर्जाची परीक्षा | २५/११/२०१५ | सकाळी १०.०० ते ११.३० |
| ८ | कनिष्ठ लेखाधिकारी ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० | १.मान्यता विदयापीठाची पदवी व कोणतेही सरकारी कार्यालय,व्यापारी भागीदारी संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील किमान ५ वर्षाचा अंखंड सेवेचा अनुभव<br>२.लेखाशास्त्र आणि लेखापरीक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा प्रथम व द्वितीय वर्गातील पदवीधारक अधिक पंसती<br>३.गणित अथवा सांख्यिकी अथवा लेखाशास्त्र व लेखापरिक्षा हे प्रमुख विषय घेऊन पदव्युतुर पदवी धारण करीत असलेल्या अथवा सरकारी कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थातील अथवा स्थानिक प्राधिकरणा -तील लेखा कार्याचा अनुभव असणा-यांना अधिक पसंती दिली जाईल.<br>नामनिदर्शेनाद्वारे नेमणुक दिलेल्या व्यक्तीला, | १०० | २०० | मराठी १२ वी दर्जा,लेखा संबंधी व इतर प्रश्न पदवी दर्जाची परीक्षा | २९/११/२०१५ | दुपारी २.०० ते ३.३० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपलेखापालाची परीक्षा त्या पदावरील त्याच्या नेमणूकीपासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण व्हावे लागेल. तो उत्तीर्ण न झाल्यास तो सेवामुक्त करण्यास पात्र होईल.परंतू अपवादत्मक बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी कारणे लेखी नमुद करुन उत्तीर्ण होण्याचे कालावधीत एक वर्षाने वाढ करु शकेल. महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परिक्षा उत्त्तीर्ण असे उमेदवार | | | | | |
| ९ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ५२००-२०२०० गेड पे.२४००/- | १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण, २.शासनाने मान्यता दिलेला स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परिक्षा उत्त्तीर्ण किंवा वास्तुशास्त्रीय आरेखक किंवा बांधकाम पर्यवेक्षक किंवा आरेखक स्थापत्य किंवा स्थापत्य अभियांत्रिकी संबंधातील उच्च अर्हता प्राप्त पदवीका/पदवीधारक किंवा सैनिकी सेवेतील कन्स्ट्रक्शन सुपरवायझर पदावरील शाखेतील अनुभवाचे प्रमाणपत्र किंवा ज्यांनी सन १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडुन घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची १ वर्ष मुदतीची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे अशा उमेदवाराच्या बाबतीत शासकीय तंत्र शिक्षण विभागाकडील त्याच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधिनराहुन ४७ वर्ष इतकी शिथील आहे. | १०० | २०० | एस.एस.सी दर्जाची परिक्षा व तांत्रिक प्रश्न | ०२/१२/२०१५ | दुपारी २.०० ते ३.३० |
| १० | औषध निर्माण अधिकारी ५२००-२०२०० ग्रेड पे.२८००/- | १.माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण किंवा समतुल्य परिक्षा उत्त्तीर्ण<br>२.औषध शाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माता असलेले उमेदवार डी फॉर्मसी (औषध निर्माता पदविका) धारण केलेले उमेदवार | १०० | २०० | सर्व विषय एस.एस.सी दर्जाची परिक्षा व औषध शास्त्र संबंधी प्रश्न | २५/११/२०१५ | सकाळी १०.०० ते ११.३० |
| ११ | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) ५२००-२०२०० ग्रेड पे.२४००/- | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील नियम ५ चा परिशिष्ट नऊ (३)(१)चा (क) चा (दोन)मधील तरतुदीनुसार उमेदवार संविधीमान्य विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. | १०० | २०० | मराठी १२ वी व इतर पदवी दर्जाची परीक्षा | २८/११/२०१५ | दुपारी १०.०० ते ११.३० |
| १२ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) ५२००-२०२०० ग्रेड पे.१९००/- | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील नियम ५ चा परिशिष्ट नऊ (५)(एक)मधील तरतुदीनुसार उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचा-याची मराठी टंकलेखन परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा मराठी व इंग्रजी टंकलेखनात ५० टक्के गुण मिळवुन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे वर विहित केल्याप्रमाणे मराठी टंकलेखन अर्हता असणे अनिवार्य राहील. जर त्यांचेकडे वर विहित केलेली इंग्रजी टंकलेखन अर्हता नसेल तर नियुक्तीच्या तारखेपासुन दोन वर्षाच्या कालावधीत ती प्राप्त करणे अनिवार्य राहील. माजी सैनिक उमेदवारांमधील सैन्य | १०० | २०० | सर्व विषय एस.एस.सी दर्जाची परीक्षा | २८/११/२०१५ | दुपारी २.०० ते ३.३० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सेवेतील trade हा operator communication असा असल्याने प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी trade Proficiency ची प्रमाणीत सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची निवड झाल्यास त्यांना मराठी टंकलेखन ३० शब्दप्रती मिनिट व इंग्रजी टंकलेखन ३० शब्द प्रती मिनिट परीक्षा नियुक्ती झालेपासुन ११ महिन्याच्या आत पास झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे बंधनकारक आहे. | | | | | |
| १३ | परिचर गट-ड ४४४०-७४४० ग्रेड पे.१३००/- | मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेची कमीत-कमी इयत्ता चौथी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | ५० | १०० | इयत्ता ४ थी दर्जा. | २९/११/२०१५ | २.०० ते ३.३० |

## -: अटी व शर्ती :-

१. **वयोमर्यादा** - (ऑनलाईन अर्ज स्विकारणेच्या शेवटच्या दिवशी)
उमेदवाराचे वय ऑनलाईन अर्ज स्विकारणेच्या शेवटच्या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी नसावे आणि खुल्या प्रवर्गासाठी-३३ वर्षापेक्षा व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**कमाल वयोमर्यादा पुढील प्रकरणी शिथीलक्षम असेल.**

अ. जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या कर्मचा-याचे बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत (नियुक्ती प्राधिका-याची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल.)
ब. शारीरिक दृष्टया अपंग उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.
क. संरक्षण दलात ६ महिन्यापेक्षा जास्त सलगसेवा केलेल्या माजी सैनिकांकरीता संरक्षण दलातील सेवा अधिक ३ वर्ष तथापी अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.
ड. स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत.
इ. प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त यांच्या नामनिर्देशित उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.
फ.सुशिक्षित बेरोजगारांना अर्थ सहाय्य या योजनेअंतर्गत तीन वर्ष अंशकालीन काम केलेल्या पदवीधर/पदविकाधारक उमेदवारांबाबत कमाल वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत.
ग. सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत.
च. खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथीलक्षम
छ. आरोग्य सेवक (महिला) पदासाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षापर्यंत शिथीलक्षम.
ज. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदा करिता ज्या उमेदवारांनी सन १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडुन घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची १ वर्ष मुदतीची पाठयक्रम परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे अशा उमेदवाराच्या बाबतीत शासकीय तंत्र शिक्षण विभागाकडील त्याच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधिनराहुन ४७ वर्ष इतकी शिथील आहे.
झ. आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचा-यांमधुन पदासाठी कमाल वयोमर्यादा कमाल ४५ वर्षापर्यंत शिथीलक्षम.

२. अ) **जाहिरातीत नमुद केलेल्या पदांचे आरक्षण बिंदुनामावली नोंदवही तपासणीनुसार व तपासणीस अधिन राहुन दर्शविण्यात आलेले आहे. बिंदुनामावली नोंदवह्या फेरतपासणी अंती जाहिरातीतील पदांच्या संख्येमध्ये कमी /जास्त बदल होण्याची शक्यता आहे. वरील जाहिरातीत नमुद पदे आरक्षणाची पदे आहेत** परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्यात स्थगित करणे वा रद्द करणे आणि अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हास्तरीय निवड समिती अहमदनगर हे स्वतःकडे राखुन ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. अथवा मा.न्यायालयात दाद मागता येणार नाही.

ब) समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस त्या त्या सामाजीक प्रवर्गातुन पदे भरणेत येतील. (माजी सैनिक वगळुन)

३. **विशेष सुचना सर्व पदांसाठी** - शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मातंस-२०१२/प्रक्र-२७७/३९, दि.०४ फेब्रुवारी, २०१३ नुसार राज्य शासनाच्या गट-अ, ब आणि क मधील कर्मचाऱ्यांना **M.S.C.I.T.** या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. तथापी खाली नमुद केलेल्या संगणक /माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.

१. **D.O.E.A.C.C./N.E.I.L.I.T.** नवी दिल्लीचे प्रमाणपत्र धारक

२. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय अभ्यासक्रमाच्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी साठी माहिती तंत्रज्ञान विषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांना व इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी साठी माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, कॉंप्युटर टेक्नीक व मल्टिमिडीया ॲंड इंटरनेट टेक्नॉलॉजी हे विषय अभ्यासुन उत्तिर्ण

३. **संविधिमान्य विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील असे उमेदवार**

४. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या संगणक तंत्र शास्त्र (**Computer Technology**) / संगणक अभियांत्रिकी (**Computer Engineering**) /माहिती तंत्रज्ञान (**Information Technology**) या विषयाचा राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा पदवी /पदवीका व संगणक उपाययोजना (**Computer Application**), संगणक उपाययोजन पध्दती व पृथक्करण (**ADCSSAA**) या पदव्युत्तर प्रगत पदवीका (**Advance Diploma**), सर्व शासन मान्य विद्यापिठातील संगणक तंत्र शास्त्र (**Computer Technology**) / संगणक अभियांत्रिकी (**Computer Engineering**) / माहिती तंत्रज्ञान (**Information Technology**) या विषयाचा राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा पदवी /पदवीका व संगणक उपाययोजना (**Computer Application**), संगणक उपाययोजन पध्दती व पृथक्करण (**ADCSSAA**) या पदव्युत्तर प्रगत पदवीका (**Advance Diploma**) उत्तिर्ण केलेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परिक्षा उत्तिर्ण

५. व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळामार्फत चालविण्यात येणारे (वरील शासन निर्णयामध्ये नमुद केलेले) परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेले संगणक विषयी ८६ अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारक

४. **सर्व पदांसाठी उमेंदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा** (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक.)

५. **<u>अर्ज कसा करावा. सर्व पदांसाठी समान सुचना.</u>**

१ जाहिरातीमध्ये नमुद निकषानुसार अपात्र असुनही अर्ज करणारा व परिक्षा देणारा उमेदवार प्रत्यक्ष नियुक्ती साठी अपात्रच असेल.

२. शासन निर्णय दि.२७ ऑक्टोबर, २००९ अन्वये प्रकल्प ग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांच्या नेमणुका जाहिरात देऊन संबंधीत पदांच्या सेवा प्रवेश नियमानुसार उमेदवारांची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करणेत येतील. त्यानुसार प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनी या जाहिरातीनुसार त्यांचे अर्ज विहित नमुन्यात व विहित कालावधीत Online पध्दतीने सादर करणे बंधनकारक राहील.

६. **ऑनलाईन अर्ज करावयाची पध्दतः-**

१. ऑनलाईन अर्ज http://exams.chanakyasoft.in/zpanagar किंवा http://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सदरच्या संकेतस्थळावर लॉगीन करुन दिलेल्या सुचनांप्रमाणे आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावेत अथवा त्याबाबत काही मदतीची आवश्यकता असल्यास जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे Chanakya Software Services Pvt.Ltd.Pune च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राशी संपर्क साधावा. सदरच्या अधिकृत केंद्राचा email ID-zpanagar2015@gmail.com किंवा ८८०५००४२५७ या क्रमाकांवर संपर्क साधावा.

२. माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून घ्यावी. ती आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट पहावी. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत प्रिंट काढून जिल्हा परिषद अहमदनगर किंवा Chanakya Software Services Pvt.Ltd.Pune ला पाठविण्याची आवश्यकता नाही. लेखी परिक्षेचे ओळखपत्र परिक्षेपुर्वी तुमच्या लॉगीनमध्ये व वेबसाईटवर उपलब्ध राहील. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

३. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परिक्षेत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादींबाबतची माहिती http://exams.chanakyasoft.in/zpanagar या संबंधीत **Website** वर वेळोवेळी उपलब्ध करुन दिली जाईल.

४. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार, मार्गदर्शन केंद्र, अहमदनगर /कौशल्यविकास या कार्यालयात व आदिवासी विकास विभागाकडे नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी स्वतंत्रपणे रितसर **Online** अर्ज करणे आवश्यक आहे. नाव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायांकित प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

५. उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करतांना सतत कार्यान्वित असलेला अचुक भ्रमणध्वनी (**Mobile Cell Phone**) क्रमांक व ई-मेल आय.डी.नमुद करावा जेणेकरुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

६. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क अदा केले आहे व संपुर्ण माहिती भरुन प्रिंट काढलेली आहे तसेच जे उमेदवार पदाच्या पात्रतेनुसार पात्र ठरले आहेत त्यांना दि. १९/११/२०१५ पासुन लेखी परिक्षेचे परिक्षा प्रवेशपत्र (**Hall Ticket/Admit card**) त्यांच्या लॉगीन आय.डी. वरुन किंवा http://exams.chanakyasoft.in/zpanagar या संकेतस्थळावरुन **Download** करता येईल.

७. परिक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परिक्षा सुरु होण्यापुर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक आहे, उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवाराने स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणुक ओळखपत्र इ. सोबत आणावे.

८. लेखी परिक्षेचे प्रश्नपत्रिकेची उत्तर तालिका (**Answer Key**) वेवसाईटवर प्रसिध्द झालेनंतर उमेदवारांची हरकत असेल तर जिल्हा परिषद अहमदनगर तक्रार निवार संकेत स्थळावर,अथवा **dyceogen_nagar@rediffmail.com** अथवा हस्तबटवडयाव्दारे उत्तरतालिका प्रसिध्द झालेनंतर ३ दिवसाचे आंत सादर करावी मुदतीनंतर प्राप्त हरकतीचा विचार केला जाणार नाही.

९. लेखी परिक्षेचा निकाल http://exams.chanakyasoft.in/zpanagar या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषदेच्या **http://nagarzp.gov.in//** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

१०. पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या उमेदवारांची यादी - http://exams.chanakyasoft.in/zpanagar च्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल व जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी झाल्याशिवाय अंतिम निवड ग्राहय धरण्यात येणार नाही.

११. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास त्यांनी ८८०५००४२५७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

१२. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील ४ मधील तरतुदींनुसार कुटुंबात दि.२८-०३-२००५ नंतर जन्मलेलें दोन पेक्षा जास्त अपत्य नाहीत याबाबतचा नमुना-अ मधील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१३. परीक्षा शुल्क भरण्याची सोय ही SBI बँकेत चलना मार्फत (बँक चलन) किंवा online payment मार्फत करण्यात आली आहे.त्यांची सविस्तर माहिती http://exams.chanakyasoft.in/zpanagar या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७ शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या नियुक्ती प्राधिकारी / खाते प्रमुखांच्या परवानगीने भरावे. (नियुक्ती प्राधिकारी यांनी खाते प्रमुखांना सदर अधिकार प्रदान केलेले असल्यास खाते प्रमुख)

८ महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती),भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.२९ जानेवारी २००४ पासुन अमलात आणला आहे. या अधिनियमातील नियम क्रं.४ (२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, खुला प्रवर्ग वगळता सर्व प्रवर्गांना लागू असेल अशी तरतुद केलेली आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याने (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सरळसेवा भरतीसाठी अर्ज स्विकृतीचे अंतिम दिनांकापुर्वी काढलेले असणे आवश्यक आहे. तसेच म.शा.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी-२०१२/प्रक्र.-१८२/विजाभज-१, दि. २५ मार्च, २०१३ सोबतच्या परिशिष्ठ-ब नुसार विहित प्रपत्रातील शपथपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

९ महिलांच्या आरक्षणांबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्रक्र-४१५/का-२ दि.२५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहिल. महिला आरक्षणाचा लाभ मिळणेसाठी महिला उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात नसल्याचे (नॉनक्रिमीलेअर) **दि.३१ मार्च २०१५** अखेरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१० अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शा.नि.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,क्रं.रक्रिधो-२००२/प्रक्र६८/क्रियुसे-२ दि.३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील. खेळाडुंसाठी राखीव असलेल्या पदांवर निवडीसाठी अर्हता पुढीलप्रमाणे असेल. सदर पदासाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांधिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, व्दितीय, तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण रौप्य किंवा कास्यपदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये **(NCC)** अंडर ऑफिसरची रँक मिळवुन राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. तसेच खेळाडुंच्या आरक्षित पदावर नेमणुकीकरिता ज्या खेळाडुंची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदाकरिता केलेला अर्ज संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविणेत येईल व त्यानुसार नियुक्ती करण्यात येईल. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती /कुटुंबातील (क्रिमिलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूंसाठी असलेले ५ टक्के आरक्षण अनुज्ञेय रहाणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इमाव, भज-क आणि भज-ड या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूंचे ५ टक्के आरक्षण अनुज्ञेय रहाणार नाही.

११ अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवा योजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे अर्जासोबत जोडावे.

१२ एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१३ उपरोक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव किमान अर्हता व अनुभव दर्शवित आहे.

१४ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याची किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार अपात्र आढळुन आल्यास उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.

१५ मराठी / हिंदी / इंग्रजी चे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१६ कंत्राटी ग्रामसेवक म्हणुन नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना दरमहा रुपये ६०००/- एकत्रित वेतन व नियमित ग्रामसेवकाप्रमाणे प्रवासभत्ता दिला जाईल.ग्रामसेवकाकडे आर्थिक व्यवहाराची जबाबदारी असल्यामुळे उमेदवाराकडुन नेमणुक देणेपुर्वी रुपये १०,०००/-सुरक्षा ठेव व दोन व्यक्तीचे जामीनपत्र घेणेत येईल.ग्रामसेवकांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीवर ३ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येईल. ज्या ग्रामसेवकांची कामगिरी समाधानकारक असेल त्यांना नियमित ग्रामसेवक पदावर नेमणुका देण्यात येतील.कंत्राटी ग्रामसेवकांना दोन महिन्याच्या सेवेसाठी एक नैमित्तिक रजा किंवा एका कॅलेंडर वर्षात ६ नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील.तसेच महिला कर्मचा-यास प्रचलित नियमानुसार प्रसुती रजा अनुज्ञेय राहील.कंत्राटी ग्रामसेवक यांच्या सेवा सेवानिवृत्ती व सेवानिवृत्तीविषयक इतर लाभासाठी ग्राह्य धरण्यात येतील.

१७ पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंन्द्र, बैठक क्रमांक प्रवेशपत्रावर नमुद करणेत येईल.

१८ शासन सामान्य प्रशासन परिपत्रक क्र प्रानिम १२१४/२८९/प्र क्र १०८/१४)/१३-अ, दि.११/३/२०१५ नुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारणे व स्पर्धा परिक्षा आवेदन शुल्क सुधारीत करणेत आले असुन ते खालील प्रमाणे आहेत. खुल्या प्रवर्गासाठी रूपये ३००/-, मागासवर्गीयांसाठी रूपये १५०/- राहील. हे परिक्षा शुल्क रोखीने स्टेट बॅक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेत संगणकीय चलनाव्दारे भरावे किंवा Chanakya Software Services Pvt.Ltd.Pune यांचे गेट वे पध्दतीने एटीएम कार्ड / डेबिट कार्ड अथवा ऑनलाईन बॅंकिंग व्दारे भरणेची सुविधा उपलब्ध आहे. करिता जिल्हा परिषद संकतेस्थळ व http://exams.chanakyasoft.in/zpanagar यावर login ID टाकल्यानंतर स्टेट बॅक खाते क्रमांक चलनासह पैसे भरणेबाबतची Link online payment मार्फत करण्यात आली आहे.

१९ माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकित छायाप्रत स्कॅन करून ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहील.

२० सदर परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

२१ अर्जाचे वेळापत्रक

| अ.क्र. | बाब | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | ०२/११/२०१५ | १६/११/२०१५ |
| २ | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बॅक ऑफ इंडिया च्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | ०२/११/२०१५ | १६/११/२०१५ |
| ३ | ज्यांचे अर्ज दिनांक १६/११/२०१५ रोजी दाखल झाले आहेत व ज्या उमेदवारांनी बॅंकेमध्ये दिनांक १७/११/२०१५ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दि.१७/११/२०१५ | |

२२ पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबत माहिती Chanakya Software Services Pvt.Ltd.Pune च्या अधिकृत वेबसाईवर उपलब्ध राहील.

२३. त्यानंतर गुणवत्ता सामाजिक व समांतर आरक्षण, व इतर विहीत निकषाच्या आधारे निवड यादी तयार करण्यात येईल.

२४. उमेदवराची निवड झाली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त होतो असे नाही.

२५. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास त्यांनी ८८०५००४२५७ या क्रमांकावर अथवा zpanagar2015@gmail.com या email ID वर संपर्क साधावा.

२६. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र अपंग १००९/प्र.क्र.२७६/०९/१६अ दिनांक १९/०३/२०१० मधील सूचनांनुसार अपंगासाठी आरक्षीत असलेली पदे खुली म्हणून घोषित केली आहेत. या पदांसाठी कोणत्याही सामाजिक प्रवर्गातील पात्र अपंग उमेदवार अर्ज करू शकतील. (तथापि प्रत्यक्ष निवडीत या पदावर निवड झालेले उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गाचे असल्यास त्यांना निवडी नंतर मागासवर्गीय बिंदूवर समायोजित करण्याची मुभा नियुक्ती प्राधिका-यांना राहील.)

टिप - १.सेवा योजन कार्यालय, आदिवासी प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हा सैनिक बोर्ड यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अंशकालीन कर्मचारी यांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार जाहिरातीप्रमाणे फी भरुन विहित पदासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे.

२.उमेदवारांनी सन २०१५ चे सरळसेवा पदभरतीचे जाहिरातीपुर्वी नोकरी मिळणेबाबत जिल्हा परिषदेकडे अर्ज केला असल्यास ते ग्राहय धरले जाणार नाही.

३.अंध व हाताने अस्थिव्यंग असलेल्या उमेदवारांकरीता लेखनिक स्वतःहा आणावे लागतील. सदर लेखनिकाची अर्हता उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेच्या एक पायरी/टप्पा कमी शैक्षणिक अर्हता असणे बंधनकारक राहील. तसेच घोषणापत्र सदरचे परिक्षेपुर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

४.उमेदवाराने स्वतःचा लेखनिक आणला असेल व जर तो लेखनिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असतील तर तो लेखनिक उमेदवाराचे शैक्षणिक पात्रते पेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावा. मात्र लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास त्यास ही अट लागु राहणार नाही.

| | | |
|---|---|---|
| सचिव<br>जिल्हा निवड समिती तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)<br>जिल्हा परिषद अहमदनगर | सदस्य<br>जिल्हा निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद,अहमदनगर | अध्यक्ष<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हाधिकारी,अहमदनगर |